**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

मा.महिला व बाल कल्याण समिती सभा क्रमांक - १

**प्रस्ताव क्रमांक :- ०१**

---

**दिनांक : ०१/ ०९ /२०२६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** महिला व बालकल्याण समितीस मंजूर असलेली सन २०२६-२०२७ अर्थसंकल्पीय तरतुदीचे विविध कामांकरीताचे नियोजन करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांची दिनांक १८/०५/२०२६ ची यादी.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये रिपोर्ट की, महिला व बाल कल्याण समितीस नियमानुसार सन २०२६-२०२७ अंदाजपत्रकात जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम (जननी शिशु सुरक्षा योजनेसह) या लेखाशिर्षक अंतर्गत रक्कम रुपये २,५५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी पंचावन्न लाख फक्त ) इतकी तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची मंजूर अंदाजपत्रकीय तरतुद विविध योजना व कार्यक्रमांवर खर्च करणे आवश्यक आहे.

मा.महिला व बाल कल्याण समितीस मंजूर असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदींचे विविध कामांकरीता नियोजन महिला व बाल कल्याण समितीच्या सभेमध्ये करण्याकरीता समितीची सभा बोलविण्यात यावी असे मा.सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजी यादी देवून सुचित केलेले आहे. या सभेमध्ये मा.सदस्यांकडून विविध कामांकरीता आर्थिक तरतुदींचे नियोजन करण्याबाबत सभेत सुचना आल्यास त्यांचा विचार करुन उचित निर्णय घेणे योग्य होईल.

तरी सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षामध्ये मा.महिला व बाल कल्याण समितीस मंजूर असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदींचे विविध कामांकरीता नियोजन करण्याचा प्रस्ताव महिला व बाल कल्याण समिती समोर निर्णयार्थ ठेवण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर नगरसचिव तथा उपायुक्त (सा) यांचा सादर की,

सोबत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी महिला व बालकल्याण समितीमार्फत राबवण्यित येणा-या योजना व त्यांवरील अंदाजित खर्चाबाबतचा तक्ता मान्यतेस्तव सादर केला आहे.
यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय- मोघम विषय आहेत, सविस्तर प्रस्ताव विवरणासह दाखल करा.
यावर फेरसादर- सदर प्रस्ताव मधील विषय मा.महिला व बालकल्याण समितीपुढे सादर करावयाचे आहेत. सदर समितीमध्ये या विषयावर समितीच्या सदस्याबरोबर चर्चा होवुन पुढील निर्णय होवुन अंदाजपत्रकीय रक्कम त्यानंतर ठरणार आहे. तरी मा.महिला व बालकल्याण समितीची सभा काढण्यास आदेशार्थ सादर.

यावर नगरसचिव तथा उपायुक्त (सा) सादर की,
यावर मा.आयुक्त साहेब यांचा सोबत जोडलेल्या तक्त्यामधील नमुद १ ते १० मधील ६ व ९ वगळुन मान्य.

(कृ.मा.प.)

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी महिला व बालकल्याण समितीमार्फत राबविण्यात येणा-या योजना व त्यांवरील अंदाजित खर्चाबाबतचा तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.न. | तपशील | रक्कम (खर्च) 'रुपये' | तरतुद रककम (शिल्लक) 'रुपये' |
|---|---|---|---|
| | **सन २०२६-२०२७ जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम खर्च ५% (ज.शि.सुरक्षा कार्यक्रमांसह) तरतुद.** | | २,५५,००,०००/- |
| | | अंदाजित रक्कम | म.बा.क. समितीने **ठरविलेली रक्कम** |
| १ | शहरातील विविध ओपनस्पेस मध्ये महिलासाठी ओपन जीम साहित्य बसविणे. | ३४.४५ लक्ष | |
| २ | शहरातील विविध ओपनस्पेस मध्ये मुलांसाठी खेळणी साहित्य बसविणे. | ३४.५० लक्ष | |
| ३ | प्र.क्र २ मधील स.नं.४३ पाईपलाईन रोड लगतच्या महापालिकेच्या मालकीच्या ओपनस्पेस मध्ये महिला व महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तु विक्री करण्यासाठी विक्री केंद्र उभारणे. | २० लक्ष | |
| ४ | प्र.क्र २ मधील स.नं. ४६ भिस्तबाग येथील अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपनस्पेसच्या जागेवर महिला व महिला बचत गटाच्या माध्यमातुन उत्पादित केलेल्या वस्तुचे विक्री केंद्र उभारणेबाबत. | २० लक्ष | |
| ५ | अर्धांगवायु झालेल्या महिलासाठी बेड खरेदी करणे व आरोग्य केंद्रा मार्फत रुग्णांना विना मोबदला देणे | ५लक्ष | |
| ६ | बचत गटातील महिलांना स्वयंम रोजगार निर्माण करण्याच्या हेतुन बचतगटच्या महिलांनी तयार केलेले विविध वस्तुचे विक्री, प्रदर्शन व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणे. | २५ लक्ष | |
| ७ | प्र.क्र १ मधील स.नं.१२ पाईपलाईन रोड येथे महिला व बालके यांचेकरीता व्यायाम शाळा उभारणे व अंगणवाडी केंद्र उभारणे | २० | |
| ८ | महिला व बाल कल्याण विभागाची माहिती महानगरपालिकेच्या पोर्टलवर प्रकाशित करणे | -- | |

**चर्चा :-**

**मा.सभापती सौ.दिपालीताई बारस्कर:-** आज आपली ही पहिली सभा आहे. त्या अनुषंगाने मी प्रशासनाचे व सर्व महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांचे स्वागत करते.

**मा.उपसभापती सौ.वर्षाताई सानप :-** आज पहिली सभा असल्याने अधिका-यांनी आपली स्वतःची ओळख करुन द्यावी.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** यांनी सर्व अधिकारी व सर्व मा.सदस्यांची ओळख करुन दिली तसेच सर्व मा.सदस्यांना विषयपत्रिका पाठविण्यांत आलेली आहे.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** महिला व बाल कल्याण समितीकरीता मनपाच्या एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या ५ % निधी राखीव ठेवण्यात येतो तो निधी खर्च झालाच पाहिजे. मनपाचे पुर्ण बजेट किती आहे.

**श्री. अनिल लोंढे-** मनपाचे पुर्ण बजेट साधारण साडे सतराशे कोटी पर्यत बजेट आहे परंतु यामध्ये शासकीय अनुदान बारा ते साडेबाराशे कोटी आहे.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** मग म.बा.क समिती करीता २.५५ कोटी बजेट कसा?

**श्री. अनिल लोंढे-** सर्व उत्पन्नावर बांधील खर्च वजा जाता तरतुद केलेली आहे.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** मागील वर्षी समिती मार्फत झालेल्या कामांचे अद्याप पर्यंत देयके अदा झालेली नाही.

**श्री. अनिल लोंढे-** मागील कामांचे ५० ते ६० टक्के देयके अदा करण्यांत आलेली आहेत.

**सौ.पुष्पाताई बोरुडे-** समिती मधील मागील कामांचे पुर्ण देयके अद्याप अदा न झाल्याने समितीचे ठरविलेली कामे होत नाही.

**मा. उपसभापती सौ वर्षाताई सानप :-** या करीता महिला व बाल कल्याण समिती करीता स्वतंत्र हेड निर्माण करुन तो निधी वर्ग केला पाहिजे.

**मा.अतिरीक्त आयुक्त श्री नागेंद्र मुतकेकर :-** महिला व बाल कल्याण समिती करीता स्वतंत्र हेड आहे. त्यातुन खर्च केला जातो.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** महिला व बालकल्याण समितीकरीता स्वतंत्र हेड आहे परंतु त्यामध्ये निधी जमा केला जात नाही, याकरीता महानगरपालिकेला दरमहा मिळणा-या उत्पन्नाच्या रकमेतील ५ % रक्कम महिला व बालकल्याण समितीच्या स्वतंत्र हेडमध्ये टाकणे गरजेचे आहे त्यानंतरच समितीने सुचविलेली कामे मार्गी लागतील.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन करण्यांत यावे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** विषय क्र.१ शहरातील विविध ओपनस्पेस मध्ये महिलासाठी ओपन जीम साहित्य बसविणे या करीता अंदाजीत रक्कम ३४.४५ लक्ष अपेक्षीत आहे.

**मा. उपसभापती सौ वर्षाताई सानप :-** ओपन जीम साहित्यासाठी रक्कम वाढविण्यांत यावी.

**सौ.पुष्पाताई बोरुडे :-** समितीच्या सदस्या व्यतिरीक्त इतर नगरसेवकांची सुध्दा त्यांच्या प्रभागात ओपनजीम साहित्य बसविण्यासाठी मागणी आहे सदरील रक्कम पुरेशी नाही.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** समितीचे १६ सदस्या आहेत प्रत्येक सदस्याच्या प्रभागास १-१ संच बसविणे कामी ही रक्कम अपुरी आहे. पारखे साहेब या बाबत काय वाटते ?

**शहर अभियंता श्री पारखे :-** पुर्वी बांधकाम विभागाकडून ओपन जीम साहित्य बसविण्यांची कार्यवाही केली जात होती परंतु सध्या क्रिडा विभागा मार्फत कार्यवाही केली जाते.

(कृ.मा.प.)

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** क्रीडा विभाग प्रमुख हे रजेवर असुन शहर अभियंता श्री.पारखे साहेब एका ओपन जिमसाठी अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे

**शहर अभियंता श्री पारखे :-** अंदाजे खेळणी व ओपनजीम साठी एका संचासाठी अंदाजे रक्कम रुपये १० लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे.

**नगरसचिव श्री.मेहेर लहारे-** विषय क्रमांक २ - शहरातील विविध ओपनस्पेस मध्ये मुलांसाठी खेळणी साहित्य बसविणे.

**मा. उपसभापती सौ वर्षाताई सानप :-** सर्व नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागात ओपन जिम साहित्य व खेळणी बसविण्या संदर्भात महिला व बालकल्याण समितीकडे पत्रे दिलेली आहेत.

**सौ.पुष्पाताई बोरुडे :-** प्रभागातील महिलांना खाजगी जिममध्ये व्यायाम करण्यासाठी दरमहा पैसे देवुन व्यायाम करावा लागतो, हे महिलांना परवडत नाही त्यामुळे सर्व सदस्यांची मागणी आहे की, ओपन जिम साहित्य बसविण्यात यावे.

**मा.अतिरीक्त आयुक्त श्री नागेंद्र मुतकेकर :-** अगोदर सर्व सदस्यांनी ठरवावे की ओपन जिम साहित्य घ्यायचे किंवा खेळण्या बसवायच्या हे ठरवावे अन्यथा ओपन जिम साहित्य व खेळण्यांसाठी अंदाजे रक्कम रुपये ६४ लक्ष ठेवावेत.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** ओपन जिम व खेळण्यांकरीता मा.अतिरिक्त आयुक्त यांच्या सुचनेनुसार रक्कम रुपये ६४ लक्ष इतका निधी राखीव ठेवण्यात येवुन हा विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** विषय क्रमांक ३- प्र.क्र २ मधील स.नं.४३ पाईपलाईन रोड लगतच्या महापालिकेच्या मालकीच्या ओपनस्पेसमध्ये महिला व महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तु विक्री करण्यासाठी विक्री केंद्र उभारणे.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-**पाईपलाईन रोड लगत महानगरपालिकेच्या मालकीचा ओपन स्पेस असुन सदरील जागा ही मोक्याच्या ठिकाणी आहे. बचत गटातील महिला ज्या वस्तु बनवितात त्या वस्तुंची विक्री करण्यासाठी या ठिकाणी विक्री केंद्र उभारावे व सदरील विक्री केंद्र महिला बचत गटांना चालविण्यास द्यावे.

**श्री.शिंदे, एन.यु.एल.एम.विभाग-** पाईपलाईन रोड भागात एकुण २०० महिला बचत गट असुन त्यामध्ये दारिद्रयरेषेखालील व दारिद्रय रेषेवरील बचत गट आहेत. सदरील बचत गट ज्या वस्तु बनवितात त्या वस्तुंची विक्री त्या स्वतः करीत असल्यामुळे त्यांना वस्तु विक्री करण्याचा अनुभव आहे, अशा महिलांना या ठिकाणी वस्तु विक्री केंद्र बांधुन दिल्यास ते चांगल्या पध्दतीने वस्तुंची विक्री करु शकतात .

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** विषय क्रमांक ४- प्र.क्र २ मधील स.नं. ४६ भिस्तबाग येथील अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपनस्पेसच्या जागेवर महिला व महिला बचत गटाच्या माध्यमातुन उत्पादित केलेल्या वस्तुचे विक्री केंद्र उभारणेबाबत.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** प्र.क्र २ मधील स.नं. ४६ भिस्तबाग महाल येथे मनपाच्या मालकीचा मोठा ओपन स्पेस असुन सदरील ठिकाणी सध्या वाहनचालक मोठया प्रमाणात वाहनांची पार्कींग करीत असतात. यामधुन महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचा आर्थिक फायदा होत नाही.

महानगरपालिकेने या ठिकाणी वस्तु विक्री केंद्राची ईमारत बांधावी व सदरील विक्री केंद्रामध्ये महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तुंची विक्री करावी. या परिसरातील २ ते ३ महिला बचत गटांनी आमच्याकडे वस्तु विक्री केंद्राबाबत मागणी केलेली आहे.

**मा.नगररचनाकार श्री.चिल्लाळ :-**सदरील ठिकाणी आपण शॉपिंग कॉम्पलेक्स बांधु शकतो, वस्तु विक्री केंद्रास परवानगी देता येत नाही. शॉपिंग कॉम्पलेक्स बांधुन त्यातील गाळे विक्री केंद्राला भाडेतत्वावर देवु शकतो.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** याबाबत शासन निर्णयामध्ये स्पष्ट निर्देश दिलेले आहेत की, मनपा हद्यीत महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंची विक्री करण्यासाठी वस्तु विक्री केंद्र उभारावे .

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सदरील विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** विषय क्रमांक ५- अर्धांगवायु झालेल्या महिलांसाठी बेड खरेदी करणे व आरोग्य केंद्रा मार्फत रुग्णांना विना मोबदला देणे.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** सदरील एका बेडची अंदाजे किंमत किती आहे

**वैद्यकिय अधिकारी डॉ.बागल-** साधारणतः एका बेडची किंमत १५ ते २० हजार रुपये आहे तसेच फाउलर बेडची किंमत अंदाजे २५ ते ३० हजार रुपये आहे. यामध्ये मॅट्रेस व स्टँडचा खर्च वेगळा करावा लागेल.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** काही नागरिकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे ते बेड खरेदी करु शकत नाहीत. जे गरजु गोरगरीब रुग्ण आहेत अशा रुग्णांना बेड दिले पाहिजेत. तसेच कै.बा.दे.दवाखान्यामध्ये अनेक जागा रिक्त आहेत परंतु महापालिका त्या जागा भरीत नाहीत, त्यामुळे रुग्णांना चांगल्या प्रकारची सेवा देण्यास अडचणी निर्माण होत आहेत. आरोग्यसेवा ही महत्वाची व तातडीची सेवा आहे. मानधन तत्वावर भुलतज्ञ व प्रसुतीतज्ञ नेमलेले आहेत परंतु ते वेळेवर उपस्थित रहात नाहीत त्यामुळे येथील रुग्णांना सेवा न मिळाल्यामुळे अनेक रुग्णांचे नातेवाईक आमच्याकडे याबाबत तक्रारी करीत असतात. वेळप्रसंगी रुग्णांना नाईलाजास्तव सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागते.

**मा.उपसभापती सौ वर्षाताई सानप :-** कै.बा.दे.दवाखन्यामध्ये मानधन तत्वावर भुलतज्ञ व ग्रसुतीतज्ञ नेमलेले आहेत परंतु त्यांचे मानधन दरमहा वेळेत दिले जात नसल्यामुळे ते दवाखान्यामध्ये वेळेवर उपस्थित रहात नाहीत अशी तक्रार नागरिकांकडुन आमच्याकडे येत आहे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सध्या महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ७५ % पेक्षा जास्त असुन नियमाप्रमाणे तो ३५ % पर्यंत पाहिजेत त्यामुळे मनपामध्ये नविन पदभरती करता येत नाही.

**मा.अतिरीक्त आयुक्त श्री नागेंद्र मृतकेकर :-** मानधन तत्वावर नेमलेले भुलतज्ञ व प्रसुतीतज्ञ यांना दिवसा व रात्री करीता स्वतंत्रपणे मानधन निश्चित करावे.

**वैद्यकिय अधिकारी डॉ.बागल-** कै.बा.दे.दवाखान्यात आया व सिस्टरची संख्या कमी असल्यामुळे दवाखान्याची दैनंदिनपणे कामे चांगल्या प्रकारे होत नाही व रुग्णांची देखभाल अडचणी येत आहे. पहिले टेंडर संपलेले असुन नविन एजन्सीला कार्यारंभ आदेश दिलेला आहे परंतु जुन्या एजन्सी ला मार्चपर्यंत

(कृ.मा.प.)

रक्कम अदा केलेली आहे परंतु पुढचे देयक अदा करणे बाकी आहे. तसेच अनेक पदे ब-याच वर्षापासुन रिक्त असल्याने सेवेवर परिनाम होत आह

**मा.अतिरीक्त आयुक्त श्री नागेंद्र मुतकेकर :-** महानगरपालिकेने नविन एजन्सीचे देयके देण्यास विलंब होत असेल तर एजन्सीने स्वत: मानधन कर्मचा-यांचे मानधन दरमहा वेळेवर द्यावे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सदरील विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** विषय क्रमांक ६- बचत गटातील महिलांना स्वयंम रोजगार निर्माण करण्याच्या हेतुन बचतगटच्या महिलांनी तयार केलेले विविध वस्तुचे विक्री, प्रदर्शन व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंची विक्री करण्याकरीता पाईपलाईन रोड किंवा भिस्तबाग महाल येथे मनपाने विक्री प्रदर्शनाचे आयोजन करावे. ज्या महिला बचत गटांना ११ वर्ष पुर्ण झालेलो आहे अशा बचतगटांना माळीवाडा येथे विक्री केंद्र सुरु करण्यात आले होते परंतु सदरील वस्तुंची विक्री किंमत जास्त असल्यामुळे तसेच वस्तुंना पॅकेजिंग करण्यासाठी अडचणी येत असल्यामुळे कृषी विभागामार्फत महिलांना पॅकेजिंग संदर्भात प्रशिक्षण दिले जात आहे. आपल्या मनपा हद्यीत २०० बचत गट आहेत. वेळेमध्ये वस्तुंची विक्री झाली नाही तर माल खराब होतो. मा.शासनाकडुन आयोजित करण्यात येत असलेल्या साई ज्योती प्रदर्शनामध्ये आपल्या बचतगटांना स्टॉल मिळत नाहीत.

**श्री.शिंदे, एन.यु.एल.एम.विभाग-** सदरील विषयाबाबत मा.सभापती , मा.उपसभापती, मा.सदस्य व अधिकारी व संबंधीत विभाग प्रमुख यांची संयुक्तिक बैठक घेवुन सदरील विषयाबाबत कार्यक्रमाची आयोजन करण्याची रुपरेषा ठरवुन कार्यक्रम यशस्विरित्या पार पाडण्यात येईल.

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन तसेच खाद्य महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिवाळी सणाच्या दरम्यान करण्यात यावे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सदरील विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** विषय क्रमांक ७- प्र.क्र १ मधील स.नं.१२ पाईपलाईन रोड येथे महिला व बालके यांचेकरीता व्यायाम शाळा उभारणे व अंगणवाडी केंद्र उभारणे

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** पाईपलाईन रोड भागातील लालगुलाब या ठिकाणी लहान मुलांसाठी अंगणवाडीची ईमारत नसल्यामुळे या ठिकाणी झाडाखाली अंगणवाडी भरविली जाते. त्यामुळे या ठिकाणी लहान मुलांसाठी २ नविन अंगणवाडी ईमारत बांधुन व ईमारतीवर व्यायामशाळा (योगा हॉल) बांधण्यात यावा.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सदरील विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** महिला व बाल कल्याण विभागाची माहिती महानगरपालिकेच्या पोर्टलवर प्रकाशित करणे

**मा.सभापती सौ दिपालीताई बारस्कर :-** महिला व बालकल्याण समितीमार्फत राबविल्या जाणा-या योजनांची माहिती तसेच मा.केंद्रशासन व मा.राज्य शासनाच्या विविध प्रकारच्या योजना मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी जेणेकरुन सर्व योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होईल.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी यांनी महिला व बालकल्याण समितीमार्फत राबविल्या जाणा-या योजनांची माहिती तसेच मा.केंद्रशासन व मा.राज्य शासनाच्या विविध प्रकारच्या योजना मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

**सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी-** मा.राज्य शासनाच्या विविध प्रकारच्या योजना मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेकरीता मा.शासनाच्या नगरविकास विभागाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध असुन त्या लिंकव्दारे आपण मनपाच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करु शकतो.

**नगरसचिव श्री मेहेर लहारे :-** सदरील विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी महिला व बालकल्याण समिती मार्फत राबविण्यांत येणा-या योजना व त्यावरील अंदाजित खर्च यावर समितीमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार खालील तक्त्यात नमुद योजना अ.नं. १ ते ८ योजना राबविण्यास व कामे करण्यास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

| अ.न. | तपशील | रक्कम (खर्च) 'रुपये' | तरतुद रककम (शिल्लक) 'रुपये' |
|---|---|---|---|
| | सन २०२६-२०२७ जेंडर बजेट महिला व बाल **कल्याण कार्यक्रम खर्च ५% (ज.शि.सुरक्षा कार्यक्रमांसह) तरतुद.** | | २,५५,००,०००/- |
| | | **अंदाजित रक्कम** | **म.बा.क समितीने ठरविलेली रक्कम** |
| १ | शहरातील विविध ओपनस्पेस मध्ये महिलासाठी ओपन जीम साहित्य बसविणे. | ३४.४५ लक्ष | ५० लक्ष |
| २ | शहरातील विविध ओपनस्पेस मध्ये मुलांसाठी खेळणी साहित्य बसविणे. | ३४.५० लक्ष | ५० लक्ष |
| ३ | प्र.क्र २ मधील स.नं.४३ पाईपलाईन रोड लगतच्या महापालिकेच्या मालकीच्या ओपनस्पेस मध्ये महिला व महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तु विक्री करण्यासाठी विक्री केंद्र उभारणे. | २० लक्ष | २० लक्ष |
| ४ | प्र.क्र २ मधील स.नं. ४६ भिस्तबाग येथील अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपनस्पेसच्या जागेवर महिला व महिला बचत गटाच्या माध्यमातुन उत्पादित केलेल्या वस्तुचे विक्री केंद्र उभारणेबाबत. | २० लक्ष | २० लक्ष |
| ५ | अर्धागवायु झालेल्या महिलांसाठी बेड खरेदी करणे व आरोग्य केंद्रा मार्फत रुग्णांना विना मोबदला देणे | ५लक्ष | ५लक्ष |

(कृ.मा.प.)

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | बचत गटातील महिलांना स्वयंम रोजगार निर्माण करण्याच्या हेतुन बचतगटच्या महिलांनी तयार केलेले विविध वस्तुचे विक्री, प्रदर्शन व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणे. | २५ लक्ष | २५ लक्ष |
| ७ | प्र.क्र १ मधील स.नं.१२ पाईपलाईन रोड येथे महिला व बालके यांचेकरीता व्यायाम शाळा उभारणे व अंगणवाडी केंद्र उभारणे | २० | २० |
| ८ | महिला व बाल कल्याण विभागाची माहिती महानगरपालिकेच्या पोर्टलवर प्रकाशित करणे | -- | -- |

सुचक :- मा.सौ. रोशनी आकाश त्र्यंबके Roshani

अनुमोदक :- मा.सौ. पुष्पा अनिल बोरुडे Mrs. P.A Borude

ठराव सर्वानुमताने मंजूर.

D.N. Baraskar

(दिपाली नितीन बारस्कर)

सभापती

महिला व बालकल्याण समिती

अहमदनगर महानगरपालिका